
Volume 9 (Special Issue 07) Jan. 2018 ISSN-No.2230-9578

COSMOS IMPACT FACTOR 4.270

# Journal of Research and Development

UGC Approved Journal UGC No. 64768

A Multidisciplinary International Level Referred Journal



College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Editor - Dr. R. V. Bhole

Journal of Research & Development
Vol.09 (Special Issue 07) Jan 2018,(ISSN 2230 9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | नाव | शोध निबंधाचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रा. सौ. कविता सु. पाटील | ब्रिटिश सत्ताकाळातील घटनात्मक विकास | ७ |
| २ | प्रा. डॉ. मनिषा जगदाळे | ब्रिटिशांचे भारतातील शैक्षणिक धोरण - एक अभ्यास | १२ |
| ३ | डॉ. उत्तम पठारे | ब्रिटिश राजवट आणि तिचे भारतावरील परिणाम | १५ |
| ४ | डॉ. संतोष कदम | ब्रिटिश काळातील सातारा शहराचा झालेला शैक्षणिक विकास | २३ |
| ५ | डॉ. रघुनाथ चौधरी | ब्रिटिश सरकारने खान्देशातील शेती विकासासाठी केलेले प्रयत्न | २७ |
| ६ | डॉ. संजय बेंद्रे | ब्रिटिश राजवट आणि भारतीय समाज | ३१ |
| ७ | प्रा. मुरलीधर गायकवाड | भारतातील ब्रिटिश कालीन दारिद्र्याची समस्या | ३४ |
| ८ | डॉ. एस. एल. म्हात्रे | कापड उद्योग आणि महाराष्ट्रातील आर्थिक विकास | ३८ |
| ९ | प्रा. अनिल निकम | इंग्रजांचे वृत्तपत्रासंबंधीचे धोरण | ४१ |
| १० | प्रा. शांता गडगे | ब्रिटिश प्रशासन व आर्थिक राष्ट्रवादाचा उदय | ४३ |
| ११ | प्रा. नवनाथ वाजगे | ब्रिटिश राजवटीतील अहमदनगर व श्रीगोंदा येथील जलव्यवस्थापन | ४६ |
| १२ | डॉ. रघुराज कुरुमकर | ब्रिटिशांचे भारतातील आर्थिक - सामाजिक व सांस्कृतिक धोरण | ४९ |
| १३ | डॉ. विष्णू पडवाल | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिलांचा सहभाग | ५३ |
| १४ | डॉ. प्रशांत देशमुख | हैदराबाद संस्थान : निजाम आणि ब्रिटिशांचे संबंध | ५६ |
| १५ | श्री. पोपट गायकवाड | ब्रिटिशांचे धोरण व आदिवासी समाज | ६१ |
| १६ | प्रा. डी. आर. कोळी | ब्रिटिश धोरणांचा भारतावरील आर्थिक प्रभाव | ६४ |
| १७ | सौ. सुनिता स. पाटील | ब्रिटिश राज्य व भारतीय शिक्षण | ७२ |
| १८ | डॉ. बाळकृष्ण पाटील | ब्रिटिशकालीन भारतीय शिक्षण व्यवस्था | ७५ |
| १९ | डॉ. संजय गवळी | ब्रिटिशकालीन महाराष्ट्रातील अंधश्रध्दा व प्रबोधन | ७८ |
| २० | डॉ. मंदा मोरे - थोरात | इंग्रज राजवटीतील भारतातील शिक्षण पध्दती : एक चिकित्सक अभ्यास | ८२ |
| २१ | डॉ. नानाजी भामरे | ब्रिटिश सत्तेचे भारतातील आर्थिक धोरण | ८६ |
| २२ | डॉ. पी. एस. सोनवणे | ब्रिटिश कायदे आणि भारतीय शिक्षण | ८९ |
| २३ | प्रा. यशवंत गावित | भारतातील इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ - एक दृष्टिक्षेप | ९९ |
| २४ | प्रा. सुनिल पाटील | ब्रिटिश आमदानीत भारतीय वृत्तपत्रांची भूमिका : विशेष संदर्भ लो. टिळक आणि केसरी | १०२ |
| २५ | डॉ. विवेकानंद चव्हाण | प्रबोधन काळातील मराठी वृत्तपत्रे व ब्रिटिश शासन | १०५ |
| २६ | प्रा. बी. आय. परदेशी | ब्रिटिशकालीन भारतीय कृषि क्षेत्रातील परिवर्तन | १०९ |
| २७ | डॉ. सुजाता गायकवाड | ब्रिटिश कायद्यांचा, व्यवस्थेचा भारतातील विविध क्षेत्रावरील प्रभाव | ११४ |
| २८ | डॉ. सर्जेराव गोल्डे | ब्रिटिश कालीन शेती व भारतीय अर्थव्यवस्था | ११९ |
| २९ | डॉ. खासेराव शिंदे-पाटील | माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांचे पुणे रेसिडंट ते डेक्कन कमिशनर म्हणून केलेले प्रशासकीय कामकाज | १२३ |
| ३० | डॉ. भारती लाडकर | ब्रिटिश काळाचा तत्कालीन स्त्री जीवनावरील सामाजिक, सांस्कृतिक प्रभाव | १२६ |
| ३१ | डॉ. देवेंद्र विसपुते | ब्रिटिशांचे भारतातील दुरगामी संरक्षण धोरण | १३३ |
| ३२ | प्रा. राजविरेंद्रसिंग गावित | [illegible] ब्रिटिश राजवटीचा आदिवासींच्या जीवनावर पडलेला प्रभाव : एक आर्थिक दृष्टिक्षेप | १३७ |


Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

# "ब्रिटिशांचे भारतातील आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिक धोरण"

प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर
सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा,
जि. अहमदनगर.
Mail. ID - kurumkar८१@gmail.com

---

**प्रस्तावना -**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार भारतात इ.स. १७५७ ते १८५७ या काळात अस्तित्वात होते. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या या कंपनीने भारतात आपली सत्ता स्थापन करताच आपल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक धोरणात बदल केला. आपला आर्थिक लाभ कसा होईल, यावरच कंपनीचे लक्ष केंद्रित होते. आपल्या ध्येयपूर्तीसाठी कंपनीने भारतीयांच्या कसल्याच भावनांचा किंवा त्यांच्या परिस्थितीचा विचार केला नाही.

**कंपनी सरकारचे आर्थिक धोरण -**

कंपनीने भारतात आपला राजकीय प्रभाव निर्माण केल्यानंतर अनुकूल असेच आर्थिक धोरण स्वीकारले. कंपनी सरकारने भारताचे आर्थिक शोषण करण्यावर अधिक भर दिला होता. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारत हा आर्थिकदृष्टया संपन्न देश होता. परंतु ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणामुळे केवळ एका शतकाच्या आतच देश दरिद्री बनला. देशात दारिद्रय, उपासमारी व बेकारी यांसारखी संकटेआली. भारतातील कच्चा माल मायदेशी घेऊन जाणे आणि त्या मालाचे पक्क्या मालात रुपांतर झाल्यास तोच माल भारत या हुकमी बाजारपेठेत विकावयाचा, असा प्रघात ब्रिटिशांनी पाडलेला होता. निर्यात कर अधिक लावल्यामुळे भारतातील माल बाहेर निर्यात होऊ शकला नाही. याउलट इंग्लंडहून भारतात येणारा माल करमुक्त होता. भारतातील बाजारपेठांत परकीय व्यापाऱ्यांचेच वर्चस्व असल्यामुळे भारतीय माल विक्रीहोऊ शकला नाही. कारण, भारतीय मालाला किंमतच राहिली नाही. ब्रिटिशांनी लहान-मोठे उद्योगधंदे उभारल्यामुळे विविध व्यवसाय उद्योगधंद्यांचा नाश झाला, परिणामी कारागिरांवर बेकारीची वेळ आली.

**शेतीची दुरावस्था -**

ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाचा फटका शेतीलाही बसला. त्यांच्या आर्थिक धोरणामुळे देशातील लहान-मोठे उद्योगधंदे संपुष्टात आले. त्यामुळे अनेक कारागिरांवर उपासमारीची वेळ आली. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येत भरमसाट वाढ झाली. परंतु शेतीचे उत्पादन घटले गेले. ब्रिटिशांनी आगमनापूर्वी भारतीय शेतकरी ज्वारी, मका, बाजरी, जव, वाटाणा, तांदूळ, गहु व भाजीपाला यांसारख्या पिकांचे उत्पादन आपल्या शेतीत काढत असे. परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंतर शेती पध्दतीत बदल झाला. पारंपारिक शेती पध्दतीचा ऱ्हास झाला. एवढेच नाही तर अनेक प्रकारची पिके घेण्यात येऊ लागली. अशा पिकांचा उपयोग भारतीयांना नाही, तर ब्रिटिशांना सर्वाधिक होऊ लागला. शेतीत चहा, कॉफी, रबर, मसाल्याचे पदार्थ यांसारख्या पिकांचे उत्पादन काढण्यात येऊ लागले. शेतीत भारतीय लोक श्रम करु लागले, तर आर्थिक लाभ मात्र इंग्रजांना होउ लागला. ब्रिटिशांच्या अशा धोरणामुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली.

**इंग्लंडकडे भारतीय संपत्तीचा ओघ -**

कंपनी सरकारच्या आर्थिक धोरणामुळे भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वाहू लागला. त्यामुळे एकेकाळी सुखी व संपत्ती समृध्द असलेला देश आर्थिकदृष्टया कंगाल बनला. ब्रिटिशांच्या धोरणामुळे देशातील व्यवसाय व उद्योगधंद्यांचा ऱ्हास झाला आणि त्या

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ठिकाणी ब्रिटिशांचे आधुनिक उद्योगधंदे स्थापन झाले. देशी उद्योगधंदे बंद पडल्यामुळे जनतेला ब्रिटिशांनी तयार केलेला माल घेणे आवश्यक होते. शेती पध्दतीतही या काळात बदल झालेला होता. आता पारंपारिक पिके घेतली जात नव्हती, तर त्याची जागा नीळ, चहा, कॉफी, रबर या पिकांनी घेतली होती. भारताचे शक्य तितके आर्थिक शोषण करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. थोडक्यात, भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वाहू लागल्याने तो देश समृध्द बनला. याउलट भारताचे आर्थिक शोषण होत राहिल्यामुळे भारत आर्थिकदृष्टया कमकुवत बनला.

**वाहतूक व दळवणवळण -**

ईस्ट इंडिया कंपनीची भारतात विशाल प्रदेशावर सत्ता स्थापन झाली होती. तेव्हा भारतातील ब्रिटिश साम्राज्याचे संरक्षण करण्यासाठी व साम्राज्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक व दळणवहणाच्या आधुनिक साधनांची आवश्यकता इंग्रजांना वाटली. त्याशिवाय विशाल साम्राज्यावर आपली सत्ता टिकविणे कठीण होते. त्यामुळे भारताच्या विकासासाठी नाही, तर स्वतःच्या फायद्यासाठी केवळ ब्रिटिशांना भारतात वाहतूक व दळणवळणाच्या साधनांत विकास करावा लागला.

लॉर्ड डलहौसीने भारतात रेल्वे, तारायंत्रे, पोस्ट खात्याची सुरुवात केली. त्यामुळे भारतीयांच्या जीवनात एका नव्या पर्वास सुरुवात झाली. लॉर्ड हार्डिंग्जने भारतात रेल्वेमार्ग सुरु करण्याची आखणी केली होती. डलहौसीने त्या योजनेची अंमलबजावणी केली. इ.स.१८५३ मध्ये मुंबई ते ठाणे, इ.स.१८५४ मध्ये कलकत्ता ते राणीगंज आणि मद्राज ते अर्काट असे तीन रेल्वेमार्ग सुरु झाले. यानंतर ठिकठिकाणी रेल्वेमार्ग टाकण्यात आले. डलहौसीने जुन्या पोस्ट खात्यात सुधारणा केल्या. अगदी कमी पेशांत कोठेही पत्र जाऊ लागले. तारायंत्राचीही सुरुवात डलहौसीने केली. त्याच्या काळात चार हजार मैल लांब तारायंत्राची सोय केली. अशा रीतीने इ.स. १८५७ पर्यंत भारतात सर्वत्र वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा निर्माण झाल्या.

जमीन महसूलविषयक धोरण :

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या शासन काळात भारतात भिन्न - भिन्न स्वरुपात विभिन्न प्रदेशात जमीन महसूल पध्दत लागू करण्यात आली.

**कायमधाऱ्याची पध्दत १७९३- (Permanent Settlement) -**

१७६५ मध्ये बंगालच्या नबाबाने कंपनीस निजामतीचे अधिकार दिले होते. यानंतर १६ ऑगस्ट १७६५ च्या अलाहाबादच्या तहानुसार सम्राट शाहआलमने बंगालच्या दिवाणीचे अधिकार कंपनीस बहाल केले. त्यानुसार लॉर्ड क्लाइव्हने मोहम्मद रजाखान व राजा सिताबराय यांची नायब दिवाण म्हणून नेमणूक केली. हे दिवाण करवसुली व न्यायदानाचे कार्य करीत असत. पुढे वॉरेन हेस्टिंग्जने क्लाइव्हची दुहेरी राज्यवयवस्था रद्द केली. त्याने करवसुली व न्यायदानाच्या कार्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात इंग्रज कलेक्टर नियुक्त केले. महसूल खात्याची देखरेख करण्यासाठी महसूल मंडळ स्थापन केले. शेवटी शेतीचा लिलाव करुन शेतसारा निश्चित करण्याचीही प्रथा हेस्टिंग्जने निर्माण केली. परंतु शेती कसावी कोणी व लिलाव करुन शेतसारा निश्चित किती प्रमाणात घ्यावा व तो वसुल कसा करावा, असे प्रश्न होते. याबाबतीत आपण कोणताच निर्णय घेतला नाही, तर शेतीची लागवड थांबेल. परिणामी कंपनीचे उत्पन्न बुडेल, अशी भीती कॉर्नवालिसला वाटत होती. त्यामुळे महसूल मंडळाचा अध्यक्ष सर जॉन शोअर, बनारसचा रेसिडेंट जोनाथन डंकन व चार्ल्स ग्रँट यांच्या सहकार्याने इ.स. १७८७ मध्ये शेतसाऱ्याबद्दलची माहिती अभ्यासास सुरुवात केली. शेतसारा वसुलीचा करार शेतकरी का जमीनदारांशी करावा

ID. NO. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

आणि शेतसारा कायमचा निश्चित करावा की परिवर्तनशील असावा, याबाबतीत चार्ल्स ग्रँट व सर जाम्न शोअर यांच्यात मतभेद निर्माण झाले. शेतसारा दहा वर्षांसाठी निश्चित करावा, असेही प्रतिपादन शोअरने केले. कॉर्नवालिसने शेतसारा कायमस्वरुपी करण्याचा विचार होता. शेवटी कॉर्नवालिसने कंपनीच्या संचालक मंडळास एक योजना सादर केली. शेवटी बिटिश पंतप्रधान विल्यम पिट आणि नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष डंडास यांनी चर्चा करुन कॉर्नवालिसच्या योजनेस मान्यता दिली. अशा रीतीने २२ मार्च १७९३ रोजी कॉर्नवालिसने बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतांसाठी कायमधाऱ्याची पध्दत लागू केली.

**कायमधारा पध्दतीचे स्वरुप -**

कंपनीने जेव्हा दहावर्षीय महसूल पध्दतीस मान्यता दिली, तेव्हा २२ मार्च १७९३ रोजी या दहावर्षीय महसूल पध्दतीस स्थायी बंदोबस्त म्हणून घोषित करण्यात आले.

१. जमीनदारांना जमिनीचा मालकीहक्क देण्यात आला. शेतकऱ्यांकडून शेतसारा असूल करीत असत आणि निश्चित केलेला वसूल सरकारला देत असत.
२. शेतसारा नेहमीसाठी निश्चित करण्यात आला. शेतसारा कमी किंवा जास्त करण्याची संधी मिळणार नव्हती.
३. शेतीची हानी झाल्यास तसेच कुळांनी जमीनदारांना बसूल कमी प्रमाणात दिला तर सरकार जमीनदारांना शेतसाऱ्याच्या बाबतीत सवलत देत असे.
४. जमिनीची विक्री करण्यासाठी जमीनदारांना सरकारच्या परवानगीची आता गरज राहिली नाही. जमीन सहजरीत्या जमीनदाराच्या वारसाकडे हस्तांतरित होत असे.

**कादमधारा पध्दतीचे गुण -**

१. बंगाल, बिहार व ओरिसामध्ये जमीनदारांना कायमस्वरुपी जमिनीचे मालकीहक्क दिले. जमीनदारांच्या वारसाना वंशपरंपरेने जमिनीचा उपभोग घेता येईल.
२. जमीनदार जमिनीची खरेदी-विक्री करु शकत असत.
३. जमीनदाराकडून वसूल केला जाणारा महसूल कायमस्वरुपी निश्चित केला असल्यामुळे त्यामध्ये कमी किंवा वाढ करण्यात येणार नव्हती. त्यामुळे शेतीच्या लागवडीस उत्तेजन मिळाले.
४. शेतसारा निश्चित करण्यात आल्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढले. तसेच सरकारला जमा-खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे सोपे झाले. या पध्दतीमुळे महसूल पध्दतीतील असणारे दोष नाहिसे झाले.
५. जोपर्यंत जमीनदार महसूल सरकारला वेळेवर देत असत, तोपर्यंत त्यांच्याकडे सरकार जमीन ठेवत असे; महसूल निश्चित वेळेत न भरल्यास सरकार त्यांच्याकडील जमीन काढून घेत असे.
६. या पध्दतीमुळे समाजात जमीनदार या नव्या वर्गाचा जन्म झाला. तो जमिनीचे मालक बनल्यामुळे इंग्रज सरकारशी एकनिष्ठ राहिल. त्यामुळे इंग्रजांचा फायदा झाला.
७. सरकार आणि शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध राहिला नाही. शेतीतील उत्पादनात वाढ झाली, तरीही सरकारला अधिक भूमिकर प्राप्त होणार नव्हता.

**कायमधारा पध्दतीचे दोष -**

१. या पध्दतीमुळे सरकारचे प्रचंड अर्थिक नुकसान झाले. कारण, सरकार आता भूमिकर वाढ करु शकत नव्हते.
२. जमीदारांनी शेतीच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. रयत जमीनदारांच्या दडपशाहीच्या वरवंअयाखाली रगडली गेली. रंगेल, विलासी, चैनी, जीवन जगणारा जमीनदारवर्ग अस्तित्वात आला.
३. या पध्दतीमुळे अनेक जमीनदारांना आपल्या जमिनीची विक्री करावी लागली.

ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

कारण, शेतसारा निश्चित ठरविण्यात आला असला, तरी त्याची वसुली शेतकऱ्यांकडून करता आली नाही. सारावसुलीसाठी जमीनदारांनी दलालांची नेमणूक केली. त्यामुळे समाजात दलालांचा एक नवीन वर्ग जन्माला आला. आपल्या जमिनी विकाव्या लागल्याने जमीनदारांत मोठा असंतोष निर्माण झाला.

४. या पध्दतीमुळे शेतीबाबतच्या खटल्यात वाढ झाली. कारण, इ. स. १७९३ पर्यंत शेतीसंबंधात कसलीही कागदपत्रे पूर्णपणे तयार नव्हती. त्यामुळे कायमधाऱ्याच्या कायद्यानंतर शेतीच्या मालकीहक्काबाबत शेतकरी व जमीनदार यांच्यात संघर्ष निर्माण झाले.

अशा रीतीने कायमस्थारा पध्दतीचे गुण-दोष पाहता असे दिसते, की या पध्दतीमुळे सरकार व शेतकरी या दोघांचेही नुकसान झाले. राष्ट्र व समाजाचा विकास थांबला. लॉर्ड कॉर्नवालिसने ही पध्दत अमलात आणण्यापूर्वी दहा-वीस वर्षे वाट पाहिली असती, तर फायदा झाला असता. कारण, या काळात सर्व परिस्थितीचे बाकाईने निरीक्षण करता आले असते. पुढे इ.स. १९४७ मध्ये कायमधाऱ्याची पध्दत रद्द करण्यात आली.

**संदर्भ --**

१. Keswani K.B, History of Modern India (१८००-१९८४) Himalay Publishing House, Bombay, १९८५.
२. Roberts P.E, History of Bristish India, Akshant Publications, Delhi,१९९०.
३. Ram Gopal, British Rule In India, Asia Publishing House, Bombay-१९६३.
४. **नी. सी. दिक्षित;** आधुनिक भारत (१७६० ते १९५०) पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर, द्वितीय आवृत्ती २००५.
५. **अनिल कठारे;** आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १८५७) प्रशांत पब्लीकेशन्स, प्रथम आवृत्ती २०१३.

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
**Savitribai College of Arts**
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar